महाराष्ट्र शासन

क्र.नियुक्ती १६१४/प्र.क्र.३८५/आ(मंत्रालय)

जलसंपदा विभाग,
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत,
४ था मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०८/०७/२०१४

## कार्यालयीन आदेश

सामान्य प्रशासन विभागाचे ज्ञापन क्र.एएससी १४१४/प्र.क्र.७१/१४-अ, दिनांक ०२.०५.२०१४ अन्वये शिफ़ारस करण्यात आलेल्या खालील नमूद महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून पीबी-२, रुपये ९३००-३४८०० वेतन बॅन्ड व रु.४३०० ग्रेड वेतन या वेतन बॅन्ड मध्ये जलसंपदा विभागात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून "सहायक" पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव व प्रवर्ग | गुणवत्ता क्रमांक | विभागात हजर होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्रीम.प्राजक्ता प्रकाश चौगुले (खुला) (महिला) | (८४/२०१३) | दि.२६.०५.२०१४ (म.पू.) |

२. श्रीम.चौगुले यांची सहायक पदावरची नियुक्ती त्यांच्या पूर्व चारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे त्यांची नियुक्ती पुढील आदेश होई पर्यंत करण्यात आली आहे व सेवा समाप्ती पूर्व सूचना न देता करण्यात येईल.

३. त्यांना असेही कळविण्यात येते की,

(१) त्यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत सेवेच्या सर्वसाधारण शर्ती नियम ११ अन्वये पात्रतेसंबंधी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. असे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

(२) त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून चार वर्षाच्या आत प्रथम तीन संधीत सहायकाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. सदरहू परीक्षा विहित संधीत/मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास ज्येष्ठता गमवावी लागेल. तसेच परीक्षा उत्तीर्ण होईपर्यत किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत त्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

(३) त्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांचे आत स्वग्राम घोषित करावे.

(४) निवृत्ती वेतन, मृत्यु नि सेवा निवृत्ती उपदान, गट विमा योजना यांसंबंधीची नामनिर्देशनपत्रे त्वरीत सादर करावीत.

(५) त्यांनी मालमत्ता व दायित्व या संबंधीची प्रपत्रे त्वरीत भरुन द्यावीत.

४. श्रीम.चौगुले यांना दि.०१.०१.२०१५ पासून राज्य शासकिय गट विमा योजना १९८२ चे सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यात येत आहे. गट विमा योजनेच्या नियमानुसार त्यांची गट विमा योजनेची वर्गणी वजाती करण्यात येईल.

५. श्रीम.चौगुले, सहायक यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मभाप १०८७/८७/२०, दि. ३०.१२.१९८७ मधील नियम क्र.४(१)(तीन) व (चार) अनुसार त्यांना एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे. तसेच त्या १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली हिंदी या निम्नस्तरीय विषयासह माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्या

असल्याने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.हिभाप-१०८३/१४४८/२०, दि.०१.१२.१९८४ अनुसार त्यांना एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे.

६. श्रीम.चौगुले, सहायक यांची महिलांच्या आरक्षित पदावर शिफारस करण्यात आली असून त्यांनी सादर केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र संचालक, महिला व बाल कल्याण, महाराष्ट्र राज्य, पूणे-१ यांचेकडून तपासून घेण्यात येईल व त्यांच्याकडून प्राप्त सूचनांनूसार कार्यवाही करण्यात येईल.

७. श्रीम.चौगुले, सहायक यांनी संगणक ज्ञानाची एम.एस.सी.आय.टी. ही परीक्षा सन-२००३ मध्ये उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

८. वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक- अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये श्रीम.चौगुले यांना नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(रा.चं.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत अग्रेषित:-

प्रधान सचिव (जसंप्र व विकास)/प्रधान सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (स्वतंत्र पत्राने)
सह सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग (१४-अ), मंत्रालय, मुंबई .
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (रोख कार्यासनामार्फत)
कार्यासन रोख (३ जादा प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासने आ(मं)/गोपनीय/नोंदणी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
श्रीम.प्राजक्ता प्रकाश चौगुले, सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
हजेरीपट लिपीक/वैयक्तिक नस्ती, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.